# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

## Agromet Advisory Bulletin

**Date : 04-06-2021**

**Weather Forecast of UMRED Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-06-04(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-06-05 | 7.8 | 36.3 | 25.0 | 46 | 27 | 12.0 | 238 | 4 |
| 2021-06-06 | 1.6 | 36.4 | 26.3 | 52 | 34 | 14.0 | 216 | 4 |
| 2021-06-07 | 0.0 | 36.7 | 27.3 | 46 | 32 | 13.0 | 243 | 2 |
| 2021-06-08 | 1.4 | 39.2 | 27.3 | 49 | 25 | 15.0 | 248 | 3 |
| 2021-06-09 | 1.0 | 39.0 | 23.8 | 59 | 25 | 19.0 | 285 | 7 |

### Weather Summary/Alert:

In Umred block,as per forecast given by, IMD, RMC, Nagpur, skywill bepartly cloudyto partially cloudy during next five days (05th,June to 09th June, 2021)and on 05th June and 06th June light to moderate rainfall along with thunderstorm accompanied with lightning and gusty winds (speed reaching 30-40 kmph) very likely to occur at isolated places and on 07th, 08th and 09th June 2021 light to moderate rainfall along with thunderstorm accompanied with lightning very likely to occur at isolated placesis forecasted.

उमरेड तालुक्यामध्ये,भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार,दिनांक ०५जून २०२१ ते ०९ जून २०२१ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते अंशतः ढगाळ तसेच दिनांक ०५ व ०६ जुन २०२१ रोजी हलका ते मध्यम पाऊस व तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याची (वाऱ्याचा वेग : ३० ते ४० किमी प्रती तास) शक्यता, दिनांक ०७, ०८ आणि ०९ जुन २०२१ रोजी हलका ते मध्यम पाऊस आणि तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

Avoid letting goats, sheep, and other animals graze in open spaces as there is a possibility of rain, gusty winds and lightning.Animals should be kept away from open water sources, rivers or lakes and tractors and metal.Vegetable and horticultural crops should be supported with bamboos depending on the stage of crop growth.Possible measures should be taken to prevent water retention in vegetables, orchards and other crops.Farmers should make available fungicides and bacterial fertilizers require

पाऊस, वादळी वारा व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे.जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. भाजीपाला आणि फळबाग पिकाला पिक वाढीची अवस्था बघून आधारद्यावा.भाजीपाला, फळबागा तसेच इतर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही यासाठी शक्य असलेल्या उपाययोजना कराव्यात.शेतकरी बांधवांनी बीजप्रक्रियेसाठी साठी लागणारी बुरशीनाशके आणि जीवाणू खताची उपलब्धतता करून ठेवावी.

### SMS Advisory:

Avoid farm operation during thunder and lightning period.

मेघगर्जना व विजांच्या कडकडाच्या वेळी शेतात कम करणे टाळावे.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| COTTON | Farmers are advice to avoid pre monsoon sowing.Crop rotation to be followed in the fields that were heavily infested with pink bollworm during last season to break the life cycle of pink bollworm. Cotton is the only host of pink bollworm, therefore crop rotation helps to break the life cycle of this pest. Crop rotation is very |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | effective in checking the infection of soil borne diseases and nematodes in disease prone fields. |
| | शेतकरी बांधवांनी कपाशीची पूर्व हंगामी लागवड टाळावी.मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झालेल्या शेतामध्ये गुलाबी बोंड अळीचे जीवन चक्र खंडित करण्यासाठी पिकाची फेरपालट करावी. गुलाबी बोंडअळीचे कापूस हे एकमेव खाद्य पिक आहे, म्हणूनच पिकाची फेरपालट करणे महत्वाचे आहे. जमिनिद्वारे होणारे रोग व सूत्रकृमींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पिकाची फेरपालट करणे हे प्रभावी गरजेचे आहे . |
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | Agricultural land should be prepared for cultivation of Arhar crop. Good quality seeds of Arhar crop should be procured from authorized seller/certified seed holder only. Rhizobium or Phosphorus Dissolving Fertilizer (PSB) {250 gm per 10 kg of seed) should be used for seed treatment.Recommended varieties of Arhar are- AKT-8811, PKV-TARA, BSMR-853, BSMR-736 and ICPL-87119(Aasha). |
| | तूर पिक लागवडीकरिता शेतजमीन तयार करावी. तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणे धारकाकडूनच करावी. तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| SOYABEAN | For soybean cultivation, select medium heavy quality, well drained soil with Soil pH 6.5 to 7.5. Considering the dry weather forecast, after ploughing the land should be leveled by giving 2 to 3 harrowing and apply 5 tons well decomposed Farm Yard Manure before the last harrowing. In view of the scarcity of soybean seeds for the coming kharif season, farmers should use household grain as seeds instead of selling them in the market. If household grains are to be used as seeds, the germination capacity of the seeds should be checked. |
| | सोयाबीन लागवडीकरिता मध्यम भारी प्रतीची उत्तम पाण्याचा निचरा होणारी, तसेच सामू ६.५ ते ७.५ असणारी जमीन निवडावी. कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता नांगरणी नंतर वखराच्या २ ते पाळ्या देऊन जमीन समपातळीत करावी त्याचबरोबर शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी ५ टन चांगले टाकावे. शेतकरी बांधवांनी येणाऱ्या खरिप हंगामासाठी सोयाबीन बियाण्याची टंचाई बघता आपल्या जवळील बियाण्याची बाजारात धान्य म्हणून विक्री न करता ते बियाणे म्हणून वापरा. घरचे धान्य बियाणे म्हणून वापरावयाचे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी. |
| GROUNDNUT | For kharif groundnut cultivation, medium, well drained, humus rich, sand mixed claysoil and organic matterrichsoil should be select. For groundnut cultivation, soil layer of 15 to 20 cm should be humorous. Apply 5 tons of well decomposed manure before the last harrowing. |
| | खरीप भुईमुग लागवडीकरिता मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, भुसभुशीत, वाळू मिश्रित चिकन माती व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. भुईमुग लागवडीकरिता जमिनीचा १५ ते २० सेंमी चा थर भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी ५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| CITRUS | For controlling citrus mealy bugs, the basin around the tree trunk should be earthed up. Wrap sticky band by smearing with mobile oil around the tree trunk and destruction of ant's nests should be done and spraying of chlorpyriphos 20 EC @ 5ml/liters of water and apply in ant nests. For control of mealy bug chlorpyriphos 20 EC @ 2ml/liters of water or dimethoate 2ml/litre of water should be done on the tree leaves and trunk. |
| | संत्र्यावरील मिली बग या किडीच्या नियंत्रणासाठी झाडाभोवतालची जमीन चाळणी करून मोकळी करावी. झाडाच्या खोडाला प्लास्टीकचा पट्टा बुंध्या भोवती गुंडाळावा व त्यावर मोबिल ऑईल किंवा ग्रीस लावावे. मुंग्यांचे वारूळ बगीच्यामधून नष्ट करावे त्यासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी ५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून मुंग्यांचे वारुळात टाकावे. मिली बग च्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी २ मिली किंवा डायमेथोइट २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्यावर फवारणी करावी. |
| CITRUS | To control snails on citrus use metaldehyde pellets. Alternatively take straw of paddy or wheat, jiggery or sugarcane molasses, yeast and methomyl40 SP or Thiamethoxam 25 % WG. In order to prepare poison bait dissolve 2kg jiggery, 25 yeasts in 10 liters water. Now add wheat or paddy husk and mix well and keep for fermentation for 10 to 12 hrs. Thereafter add 100 g methomyl or 50g Thiamethoxam 25% WG and spread it at the base of citrus tree trunk in the evening |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | throughout the entire orchard. Citrus snail will be attracted and will die after feeding on such poison bait. |
| | शंख कीड किंवा गोगलगाईच्या नियंत्रणासाठी मेटाल्डीहाईड या किटकनाशकाच्या गोळ्यांचा वापर करावा. मेटाल्डीहाईड चे दाने संपूर्ण बगिच्यामध्ये झाडाखाली पसरून टाकावे किंवा १० लिटर पाण्यामध्ये २ किलो गुळ आणि २५ ग्राम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे व त्यामध्ये ५ किलो गव्हाचा किंवा भाताचा कोंडा टाकून चांगले मिसळावे व १० ते १२ तास हे मिश्रण आंबवण्यासाठी ठेवावे. त्यानंतर १०० ग्राम मिथोमिल ४० SP किंवा ५० ग्राम थायमेथोक्झाम २५ % WG चांगल्या प्रमाणात मिसळावे. प्रभावग्रस्त भागात हे मिश्रण मिसळून द्यावे. आमिषांच्या गंधाने शंख कीड आकर्षित होईल व ते खाल्ल्यानंतर नष्ट होतील. |
| CITRUS | In case a new orchard of citrus is to be established then dig the pits of size (75cm x 75cm x 75cm) at 6 x 6 meter spacing for Nagpur Santra (Nagpur mandarin), Mosambi (Sweet orange) and acid lime and the pits should be kept exposed to solar rays. |
| | लिंबूवर्गीय (संत्रा, मोसंबी आणि लिंबू) फळबाग लागवडीसाठी नागपूर संत्रा (नागपूर मंडारिन), मोसंबी आणि लिंबू साठी (७५सेमी x ७५ सेमी x ७५ सेमी) आकाराचे खड्डे ६ X ६ मीटर अंतरावर खोदावेत. तसेच खड्ड्यामध्ये पुरेसा सूर्यप्रकाश पडेल याची काळजी घ्यावी. |

## Live Stock Specific Advisory:

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| BUFFALO | Deworming of livestock should be done by seeking advice of Veterinary practitioner.One week after Deworming, vaccinate the cattle and buffaloes against Foot, & mouth disease (FMD), Black quarter (BQ) and Haemorrhagic Septicaemia (HS).Keep the livestock under the shed to protect from heat. |
| | जनावरांना पशु वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्लाने जंतनाशाकाची मात्रा/लस दिल्यावर एक आठवड्यानंतर गायी आणि म्हशींना तोंडखुरी/पायखुरी, एकटांग्या, घटसर्प टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. |
| GOAT | Vaccinate thegoat against FMD, HS, PPR and enterotoxaemia.Offer clean and cold water (stored in earthen pot) to the animals. Keep the livestock under the shed to protect from heat. |
| | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |

## Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| AGRI FIELD | For paddy crop nursery, plow the land, break up the lumps and make raise bed of 100 cm wide and 10 cm high. Apply 300 kg of well decomposed FYM, 1 kg of urea and 3 kg of single super phosphate to the soil per R area. |
| | धान पिक रोपवाटीकेसाठी जमीन नांगरून, ढेकळे फोडून भुसभुशीत करावी आणि १०० सेंमी रुंद व १० सेंमी उंच लांबीचे गादीवाफे तयार करावे. या गादीवाफ्यावर दर आर क्षेत्राला ३०० किलो चांगले कुजलेले शेणखत, १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फोस्फेट जमिनीत टाकून मिसळावे. |
| AGRI FIELD | The previous crop should be plowed immediately after harvest. Apply 10 tons of farm yard manure or compost per hectare after field waste collection. Before sowing the seeds of green manure crop in the field, 2 to 3 cultivars should be given and after monsoon rains, 60 kg seed per hectare of Dhaincha or Sunhemp crop should be sown. Adequate improved seed varieties should be made available during kharif season. Salt water treatment: Add 300 gms of salt in 10 liters of water and pour the seeds in it. Once the solution is stable, remove the floating diseased seeds through a sieve and burn. The healthy seeds at the bottom should be washed 2-3 times with clean water and kept in the shade for 24 ho |
| | मागील पिकाची कापणी नंतर त्वरित नांगरणी करावी. शेतातील काडीकचरा वेचनिनंतर शेणखत किंवा कंपोस्ट खत 10 टन प्रती हेक्टर टाकावे. हिरवळीच्या खताच्या पिकाचे बियाणे शेतात फेकण्यापूर्वी २ ते ३ कुळवणी च्या पाळ्या दिल्या पाहिजे तसेच मान्सून च्या पावसानंतर बोरू |

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| | किंवा ताग पिकाचे प्रती हेक्टरी ६० किलो बियाणे फेकावे. खरीप हंगामामध्ये पुरेश्या प्रमाणात सुधारित धान वाणाचे बियाणे उपलब्ध करून ठेवावे. मिठाच्या पाण्याची प्रक्रिया: १० लिटर पाण्यात ३०० ग्राम मीठ टाकून त्याचे द्रावण बनवून त्यात बियाणे ओतावे, द्रावण स्थिर झाल्यावर तरंगणारे हलके रोगयुक्त बियाणे चाळणीने काढून जाळून टाकावे. तळातील निरोगी बियाणे २-३ वेळा स्वच्छ पाण्याने धुवून सावलीत २४ तास ठेवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम ३ ग्राम प्रती किलो बियाणे प |
| GENERAL ADVICE | At the time of purchasing seed, farmers are advised to check the detail on tag/label such as, name of crop, crop kind, variety, physical and genetic purity percentage, germination and inert matter percentage, net weight, lot and batch number, date of testing and packing, maximum retail price, moisture percentage etc. Take the original bill from the seller and ensure that the signature on bill of both seller and seed purchasing farmers. |
| | शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |
| GENERAL ADVICE | At the time of purchasing seed, farmers are advised to check the detail on tag/label such as, name of crop, crop kind, variety, physical and genetic purity percentage, germination and inert matter percentage, net weight, lot and batch number, date of testing and packing, maximum retail price, moisture percentage etc. Take the original bill from the seller and ensure that the signature on bill of both seller and seed purchasing farmers. |
| | शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |
| GENERAL ADVICE | Farmersand farmlabor are to follow precautions and safety measures to be taken to prevent theCOVID-19 disease spread. Simple measures include social distancing, maintaining personal hygiene by washing of hands with soap, wearing of face mask, protective clothing and cleaning of implements and machinery. Workers to follow safety measures and social distancing at each and every step in the entire process of field operations.Precautions and safety measures of workers engaged in repair, maintenance and harvesting operation is to be ensured.In case of manual field operations of harvesting/ picking, accomplish the operation in 4-5 feet spaced strips assigning one strip to one person. This will ens |
| | सर्व शेतकरी बंधू आणि शेतमजुरांनी कोविड- १९ रोगाचा प्रसार रोखण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या सर्व खबरदारी आणि सुरक्षा उपायांचे पालन केले पाहिजे. साध्या उपायांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे, साबणाने हात धुवून वैयक्तिक स्वच्छता राखणे, चेहऱ्यावर मुखवटा घालणे, संरक्षक कपडे आणि इतर शेतीपयोगी उपकरणे व यंत्रसामग्री स्वच्छ करणे आवश्यक आहे. शेती कामातील सर्व प्रक्रीयेमेध्ये सुरक्षित उपाययोजना आणि शेती कामगारांनी सामाजिक अंतर बाळगणे आवश्यक आहे. कापणी/वेचनीचे कामे असल्यास, एका व्यक्तीला ४ ते ५ फुटाची काठी वाटप करून ठराविक त्या पट्टीच्या अंतरामध्येच कामे पूर्ण करावी, जेणेकरून व्यस्त कामगारांच्या दरम्यान पुरेसे अंतर सुनिश्चित करेल. |
| GENERAL ADVICE | Cultivation of land (Ploughing, harrowing) should be done parallel to counter line or horizontally along the main slope. Therefore, rain water seeps into the soil and helps to reduce soil erosion. |
| | जमिनीची मशागत (नांगरणी, वखरणी) समतल किंवा मुख्य उताराला आडवी करावी. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते. |
| SOIL TESTING | Soil samples for soil testing should be taken and sent to the nearest Agriculture university, Krishi Vigyan Kendra or other government soil testing laboratory with appropriate soil testing charges. |

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
| --- | --- |
| | माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते जवळच्या विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र किंवा इतर शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षणाच्या अहवालानुसार पिकानुसार रासायनिक खताचे किंवा इतर कृषी निविष्ठांचे नियोजन करावे. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: If you are working in the field, take shelter immediately near the field. After taking shelter in a safe place in the field, keep dry wood, plastic, gonapath, dry mulch under the feet. Sit with both feet together and both hands on your knees. Make sure that no part of your body touches the ground except your feet. Individuals working in ponds, such as places where there is moisture in the soil or water sources, should go to a safe and dry place immediately. If there are tall trees nearby, take shelter at a distance twice the height of that tree. |
| | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: A pucca house is the safest place to avoid lightning. Farmers should plant trees as low as possible around their houses and livestock sheds. Moist, swampy places and water sources (wells, lakes, rivers, farm ponds etc.) should be avoided as much as possible. If traveling in a four-wheeler, stop in the vehicle. Farmers should take care that they do not have any metal tools. When working in the field, do not let more people work together at the same time. Care should be taken to keep a distance of at least 15-20 feet between two persons. Do not use an umbrella with a metal rod. Stay away from other electric tools made by farmers as |
| | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून द |